# नाशिक महानगर पालिका, नाशिक
# सार्वजनिक आरोग्य विभाग
## (जाहिरात)
### प्रयोग शाळा तंत्रज्ञ (मानधन) खुला प्रवर्गासाठी भरती बाबत

नाशिक महानगरपालिका नाशिक सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत प्रयोग शाळा तंत्रज्ञ या पदाकरीता ०६ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर भरती करणेकामी अहर्ता धारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व संबंधीत उमेदवारांनी किमान शैक्षणिक अहर्ता धारण करीत असल्यास आवश्यक त्या सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह नाशिक महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या **nmcmsmd@nmc.gov.in** या ई मेल आयडी वर पाठविण्यात यावेत. समक्ष कार्यालयात अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

सदर अर्ज ऑनलाईन सादर करण्याचे दि. ०७/०७/२०२० ते ०९/०७/२०२० पर्यंत एकुण ३ दिवसांच्या आत सायंकाळी ६ वाजे पर्यंत स्विकारण्यात येईल. त्यानंतर येणा-या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

मुदतीच्या आलेल्या अर्ज स्विकृती व अर्जाची छाननी पुर्ण झाल्यानंतर अंतिम वर्षाच्या गुणां नुसार व अनुभवानुसार निवड झालेल्या उमेदवारांची यादी मनपाच्या https://nashikcorporation.in/ या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. कोणत्याही उमेदवाराची कोविड-१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे प्रत्यक्ष मुलाखत किंवा लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. अर्ज केलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारे लेखी कळविण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास त्याच दिवशी रुजु व्हावे लागेल. अन्यथा रुजु न झाल्यास आदेश रद्द करण्यात येईल.

**भरती करावयाची प्रयोग शाळा तंत्रज्ञ पदाची माहीती**

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या | मासिक मानधन र. रु. |
|---|---|---|---|
| १ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ (खुला प्रवर्ग) | १ | ८,४०० |

**पदनिहाय शैक्षणिक अहर्ता**

| अ. क्र. | पदनाम | आवश्यक शैक्षणिक अहर्ता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | बीएससी, डीएमएलटी कोर्स,(मायक्रो बायोलोजिस्ट) | रक्त पेढीत काम केल्याचा अनुभव व ट्रुनॅट मशिन हाताळण्याचा अनुभव |

- प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाकरीता किमान पात्रता बीएससी, डीएमएलटी शासनाची मान्यता असलेल्या संस्थेच्या शासनमान्य कोर्स आवश्यक आहे.
- सदर पद हे तात्पुरत्या स्वरुपाचे असल्याने नाशिक महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवर कायम करण्याचा हक्क राहणार नाही.
- अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत असणारा अनुभव ग्राह्य धरला जाईल

- अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेल्या शैक्षणिक कागदपत्रे रुजु होतांना मुळ कागदपत्रे सोबत आणणे अनिवार्य आहे.
- उमेदवारांनी पासपोर्ट साईझ २ फोटो , जन्म तारखेकरीता शाळा सोडल्याचा दाखला, फोटो आयडी करीता मतदान ओळखपत्र किंवा आयडी कार्ड शैक्षणिक अहर्ता कामी बीएससी शेवटच्या वर्षाची गुण पत्रिका, रजिस्ट्रेशन व नुतनीकरण प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र आवश्यक राहील.
- उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे राजकिय दबाव आणल्यास नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
- जाहीरात मध्ये बदल करणे, भरती प्रक्रिया स्थगित करणे, रद्द करणे, प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी राखुन ठेवलेला आहे.
- उमेदवार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

**Sd xxx/-**

वैद्यकीय (आरोग्य) अधिकारी

नाशिक महानगर पालिका, नाशिक.